**राज्यात एकूण ११ अपर जिल्हाधिकारी पदे निर्मितीस मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्राफेब-२०२६/प्र.क्र.१५/पुनर्रचना**
मंत्रालय, पहिला माळा, मुख्य इमारत
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
दिनांक: ११ मार्च, २०२६

**प्रस्तावना:-**

नागरी क्षेत्रामध्ये वाढलेली लोकसंख्या, जिल्हा/तालुक्यातील दूरच्या भागातील जनतेस तातडीने व नजिकच्या ठिकाणी सेवा उपलब्ध व्हाव्यात तसेच सद्यस्थितीत जिल्हा तसेच तहसिल कार्यालयातील कामकाजाचा वाढता व्याप या सर्व बाबींचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार राज्यात अपर जिल्हाधिकारी पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे शासकीय वसुली, गौणखनिजे, नगरपरिषदा व ग्रामीण भागातील जमिनीचे व्यवस्थापन, जमाबंदी, जमीन सुधार विधीविधानांची अंमलबजावणी, ग्रामपंचायत व नोंदणी अधिनियम विषयक बाबी, महसूल अधिनियमांखालील अपीले, गावठाण विस्तार, भूसंपादन, बेघर भूमिहिनांचे घरकूल, प्रकल्पबाधित व पुरग्रस्त पुनर्वसन, जिल्हा परिषद व पंचायत समिती विषयक असे एकूण ३९ विषयांचे कामकाज तसेच शेती महामंडळ जमीन वाटप, कृषीगणना, विविध जमीन विक्री/मंजुरी परवानग्या, पिकपैसेवारी, अतिक्रमण कार्यवाही, डाटा बँक अद्ययावतीकरण व राजशिष्टाचारविषयक जबाबदाऱ्या येतात. दुर्गम व आदिवासी बहुल तालुके, वाढता भौगोलिक व्याप व लोकसंख्येमुळे कामाचा भार वाढल्याने आणि नागरिकांचा वेळ-खर्च टाळण्यासाठी राज्यात अपर जिल्हाधिकारी संवर्गातील एस-२५ (₹७८८००-२०९२००) वेतनश्रेणीतील ११ नवीन पदे निर्माण करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ९१/२०२६/ व्यय-९ दिनांक ९/२/२०२६ आणि नवीन पदनिर्मिती, पदांचे पुनरुज्जीवन व पदांचे आढावे इत्यादी प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी स्थापन केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक ०९/०१/२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार तसेच मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक १०/०२/२०२६ च्या बैठकीत प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३१११८१५४५३९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT SOPANRAO DESHMUKH

Digitally signed by AJIT SOPANRAO DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D36A0A6455652C60EA76104DD537113A9CA67AB14A315B9CEFC36FC9BE2915F8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=704CB545C50221B15CDE7CCB8854E694C765DFB3A0240E891EBFB56EE79E3440, cn=AJIT SOPANRAO DESHMUKH
Date: 2026.03.11 18:16:36 +05'30'

**(अजित देशमुख)**
**सह सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (न.वि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (र.व का), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) विभागीय आयुक्त, कोकण
१५) विभागीय आयुक्त, पुणे
१६) विभागीय आयुक्त, नाशिक
१७) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
१८) विभागीय आयुक्त, अमरावती
१९) विभागीय आयुक्त, नागपूर
२०) संबंधित जिल्हाधिकारी
२१) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
२२) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
२३) कार्यासन अधिकारी,महसूल व वन विभाग(कार्यासन ई-१/ ई-८/ब-१)
२४) वित्त विभाग (का. विसू-१/ अर्थसंकल्प -६/ व्यय-९/ आ.पु.क.), मंत्रालय, मुंबई.
२५) महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने.
२६) निवड नस्ती-कार्यासन पुनर्रचना.